असा. क्र. ३४ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०७

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

शनिवार, ऑगस्ट १८, २००७/श्रावण २७, शके १९२९

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम**

**अनुक्रमणिका**

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ६.**—महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यात आणखी सुधारणा करण्याकरिता अध्यादेश . . | २६५-२६७ |

**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १८ ऑगस्ट २००७.

**MAHARASHTRA ORDINANCE No. VI OF 2007.**

AN ORDINANCE

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA CO-OPERATIVE SOCIETIES ACT, 1960.

**सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ६.**

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यात आणखी सुधारणा करण्याकरिता अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

१९६१ चा महा. २४. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यात आणखी सुधारणा करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ;



[किंमत : रुपये ९.००]

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) अध्यादेश, २००७ असे म्हणावे.

(२) तो, तात्काळ अंमलात येईल.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ७३क ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० याच्या कलम ७३क मध्ये,— १९६१ चा महा. २४.

(क) पोट-कलम (५) वगळण्यात येईल ;

(ख) समासटीपेमधील " किंवा दहापेक्षा अधिक वर्षांसाठी त्याच संस्थेचे पदनिर्देशित अधिकारी होण्याकरिता " हा मजकूर वगळण्यात येईल.

## निवेदन

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० याच्या कलम ७३क च्या पोट-कलम (५) मध्ये, कोणतीही व्यक्ती, एकूण दहा वर्षांपेक्षा अधिक कालावधीकरिता कोणत्याही सहकारी संस्थेचा पदनिर्देशित अधिकारी असणार नाही किंवा असण्याचे चालू राहणार नाही, अशी तरतूद आहे. यामध्ये आणखी अशीही तरतूद आहे की, उक्त दहा वर्षांचा कालावधी संपल्यानंतर, अशी कोणतीही व्यक्ती, त्या संस्थेचा पदनिर्देशित पदाधिकारी असण्याचे समाप्त होईल आणि पूर्वोक्त दहा वर्षांचा कालावधी पूर्ण झाल्यापासून समितीच्या एका सत्र भागाचा कालावधी समाप्त होईपर्यंत ती, असा पदनिर्देशित पदाधिकारी म्हणून फेरनिवड किंवा फेरनेमणूक केली जाण्यास पात्र असणार नाही. उक्त कलम ७३क च्या पोट-कलम (१) मध्ये " पदनिर्देशित अधिकारी " याची व्याख्या अशी करण्यात आली आहे की, त्यात सभापती आणि अध्यक्ष आणि राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे सहकारी संस्थेचा जो अधिकारी पदनिर्देशित अधिकारी म्हणून जाहीर करील अशा कोणत्याही अधिकाऱ्याचा समावेश होतो. यामुळे कोणतीही व्यक्ती, दहा वर्षांपेक्षा अधिक कालावधीसाठी त्याच संस्थेचा पदनिर्देशित अधिकारी म्हणून राहू शकत नाही.

२. शासनाच्या असे निदर्शनास आणून देण्यात आले आहे की, दहा वर्षांपेक्षा अधिक कालावधीकरिता एकाच संस्थेचा पदनिर्देशित अधिकारी म्हणून चालू राहणाऱ्या व्यक्तीस अनर्ह ठरविणाऱ्या उपरोक्त तरतुदीमुळे, खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणाच्या या युगामध्ये सहकारी संस्था अशा व्यक्तीच्या विशेष अनुभवाचा लाभ घेण्यापासून वंचित होत आहेत. म्हणून शासनास, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६०, याच्या कलम ७३क चे पोट-कलम (५) वगळणे इष्ट आहे असे वाटते, जेणेकरून सहकारी क्षेत्रातील कामाचा अनुभव असणारी निष्णात अशी व्यक्ती, जोपर्यंत सदस्यांचा त्यांच्यावर विश्वास आहे तोपर्यंत, त्याच संस्थेचा पदनिर्देशित अधिकारी म्हणून राहू शकेल.

३. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि पूर्वोक्त प्रयोजनांसाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (१९६१ चा महा. २४) यांत आणखी सुधारणा करण्याकरिता तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे आणि म्हणून हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक १८ ऑगस्ट २००७.

**एस. एम. कृष्णा,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अशोक सिन्हा,**
शासनाचे प्रधान सचिव.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

असा. क्र. ६६ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

शनिवार, ऑगस्ट १८, २००७/ श्रावण २७, शके १९२९

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग आठ

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधि व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Co-operative Societies (Amendment) Ordinance, 2007 (Mah. Ord. VI of 2007), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

A. M. SHINDEKAR,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

---

## CO-OPERATION, MARKETING AND TEXTILES DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 18th August 2007.

## MAHARASHTRA ORDINANCE No. VI OF 2007.

*AN ORDINANCE*

*further to amend the Maharashtra Co-operative Societies Act, 1960.*

WHEREAS both Houses of the State Legislature are not in session ;

AND WHEREAS the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary for him to take immediate action further to amend the Maharashtra Co-operative Societies Act, 1960, for the purposes hereinafter appearing ; Mah. XXIV of 1961.

NOW, THEREFORE, in exercise of the powers conferred by clause (*1*) of article 213 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to promulgate the following Ordinance, namely :—

Short title and commencement.

**1.** (*1*) This Ordinance may be called the Maharashtra Co-operative Societies (Amendment) Ordinance, 2007.

(*2*) It shall come into force at once.

Amendment of section 73-A of Mah. XXIV of 1961.

**2.** In section 73-A of the Maharashtra Co-operative Societies Act, 1960,— Mah. XXIV of 1961.

(*a*) sub-section (*5*) shall be deleted ;

(*b*) in the marginal note, the words " or for being designated officer of the same society for more than ten years " shall be deleted.

STATEMENT

Sub-section (*5*) of section 73-A of the Maharashtra Co-operative Societies Act, 1960 provides that no person shall be, or shall continue to be, a designated officer of any Co-operative society for a period of more than ten years in the aggregate. It further provides that at the expiration of the said period of ten years any such person shall cease to be a designatd officer of that society and shall not be eligible for being re-elected or re-appointed as a designated officer, until a period of one term of the committee has elapsed after the completion of the aforesaid period of ten years. Sub-section (*1*) of the said section 73-A defines the expression "a designated officer" to mean the Chairman and the President, and any other officer of the Co-operative Society as may be declared by the State Government, by Notification in the *Official Gazette,* to be a designated officer. As such, no person can continue to be the designated officer of the same society for more than ten years.

2. It has been brought to the notice of the Government that in this era of privatization, liberalisation and globalization, the aforesaid provision, which disqualifies the person for being continued, as a designated officer of the same society for a period of more than ten years, is depriving the societies from the benefit of expertise of such persons. The Government, therefore, considers it expedient to delete sub-section (*5*) of section 73-A of the Maharashtra Co-operative Societies Act, 1960, so that the efficient director and office bearer of the Co-operative Society, who has gained valuable experience in the Co-operative field, can continue to be the designated officer of the same society till he enjoys the confidence of its members.

3. As both Houses of the State Legislature are not in session and the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary for him to take immediate action further to amend the Maharashtra Co-operative Societies Act, 1960 (Mah. XXIV of 1961), for the purposes aforesaid, this Ordinance is promulgated.

Mumbai, S. M. KRISHNA,
Dated the 18th August 2007. Governor of Maharashtra.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

ASHOK SINHA,
Principal Secretary to Government.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई